सूचनापत्र

## कार्यकारिणी समिती मासिक सभा - दिनांक ०७/०७/२०२४

### सभेची सूचना

संस्थेच्या कार्यकारिणी सभासदांना सूचित करण्यात येते की माहे ची ~~सभा~~ कार्यकारिणी समितीची मासिक सभा दिनांक १४/०७/२०२४ रोजी रात्रौ ८.३० वाजता संस्थेचे सचिव श्री. विजय जेठवा, फ्लॅट क्र. ६ यांचे निवासी खालील विषयांवर चर्चा व ठराव करण्यासाठी आयोजित केली असून सर्व कार्यकारिणी सभासदांनी नियोजित वेळेवर उपस्थित रहावे.

विषय :

1) दि. १७/१२/२०२३ रोजी पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ६ च्या अनुषंगाने संस्थेची website तयार करणेविषयी.
2) दि. १७/१२/२०२३ रोजी पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ६ च्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती करणे.
3) दि. १७/१२/२०२३ रोजी पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ६ च्या अनुषंगाने पुनर्विकास प्रक्रिया पार पडण्यासाठी कायदेशीर सल्लागार नेमणे

संस्थेचे सचिव / अध्यक्ष

## व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त. - दि १४/०७/२०२४

दिनांक १४/०७/२०२४ रोजी पार पडलेल्या कार्यकारिणी समितीच्या मासिक सभेस खालील कार्यकारिणी सभासद हजर होते.

1) डॉ. श्री आशिष प्रभाकर गांधी
2) श्रीमती दिपाली प्रभाकर साळुंखे
3) श्रीमती नंदा जेठवा — નંદા. ચંદ્રકાંત જેઠવા.
4) श्री. सुदेश जोशी
5) श्री. विजय जेठवा
6) श्री. प्रदीप साठे
7) श्री. दिलीप लक्ष्मण देशमुख

विषय क्र. १ - संस्थेची वेबसाईट (website) तयार करणेविषयी

ठराव :

सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींच्या पुनर्विकास योजना संबंधी शासन निर्णय क्रमांक सगृयो/२०१८/प्र.क्र ८५/१४-स

दिनांक ०४ जुलै २०१९ च्या मुद्दा क्रमांक ६ अनुसार पुनर्विकास प्रकल्पाच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने संस्थेने इंटरनेटवर संकेतस्थळ तयार करणे जरुरी आहे तसेच ई-मेल तयार करणे जरुरी आहे. सदरहू कामी या कामात अनुभवी व वाकबगार असलेल्या संस्थांकडून दरपत्रक मागविण्यात आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

१) मे. SME कन्सल्टिंग सर्विसेस. रु. २५,०००/-
२) मे. डिजिटल राजेश १० X. रु. २०,०००/-
३) मे. सनराइज वेब कॉर्प रु. १५,०००/-

सर्वात कमी दरपत्रक मे. सनराइज वेब कॉर्प यांचे रु. १५,०००/- हे ठरल्याने संस्थेची वेबसाईट व ई-मेल आय डी तयार करण्यासाठी त्यांची निवड व नेमणूक करण्यात आली. तसे नेमणूक पत्र त्यांना देण्यात यावे.

सूचक - श्री. सुदेश जोशी
अनुमोदक : श्री. दिलीप देशमुख
ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक - २ - प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणे.

ठराव :

शासन निर्णय क्रमांक सगृयो/२०१८/प्र-क्र ८५/१४-स दिनांक ०४ जुलै २०१९ च्या मुद्दा क्रमांक ५ अनुसार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे जरुरी आहे. या अनुषंगाने या क्षेत्रातील खालील वास्तुविशारदांनी ~~च्या~~ प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ज्यामध्ये Project feasibility चा अंतर्भाव असेल व त्या अनुषंगाने विकासक नेमणे पर्यंत सर्व काम करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात आले. एकूण तीन वास्तुविशारदांनी ~~च्या~~ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यास इच्छुक असल्याबाबतचे पत्र व दरपत्रक संस्थेकडे जमा केले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

१) मे. स्टुडिओ डिझाइन आर्किटेक्चर्स, नवीन पनवेल रु. २,११,०००/-
२) मे. एन्टिटी आर्किटेक्ट्स नवीन पनवेल. रु. १,५१,०००/-
३) मे. आर. आर. पाटील आर्किटेक्चर्स, पनवेल रु. १,२५,०००/-

मे. आर. आर. पाटील आर्किटेक्चर्स यांचे दरपत्रक सर्वात न्यूनतम आढळल्याने ~~व~~ त्यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करण्यास सभेने सर्वानुमते मान्यता दिली. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार

यांच्या कामाची व्याप्ती पुढीलप्रमाणे :
१) संस्थेची इमारत, जमीन व सभासदीतील सदनिकांचे सर्वेक्षण करणे, चटई क्षेत्र मोजणे
२) महानगरपालिकेच्या प्रचलित नियमावलीनुसार उपलब्ध एफ.एस.आय., टीडीआर, प्रिमियम एफ.एस.आय. यांचा विचार करुन प्रस्तावित इमारतीचा वास्तववादी प्रकल्प अहवाल तयार करणे.
३) नियुक्तीचे दिनांकापासून १ महिन्याचे आत वास्तववादी प्रकल्प अहवाल संस्थेस सुपूर्द करणे.
४) प्रस्तावित इमारतीच्या बांधकामासाठी ~~मुख~~ विकसनकार नेमणेकामी निविदा तयार करणे निविदा नोटीस तयार करणे.
५) प्राप्त निविदांचा तुलनात्मक अहवाल तयार करुन सर्वोत्तम विकासकाची निवड करणेसाठी संस्थेस मार्गदर्शन करणे.

असा ठराव करणेत आला की, वरील सर्व कामांसाठी न्यूनतम दर असलेल्या मे. आर. आर. पाटील आर्किटेक्ट्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी त्यांस नियुक्तीपत्र देण्यास सभेने सर्वानुमते मान्यता दिली आहे.

सूचक : श्री. सुदेश जोशी
अनुमोदक : श्री. दिलीप देशमुख

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ३ – कायदेशीर सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत

ठराव : सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास योजना संबंधी शासन निर्णय दिनांक ०४ जुलै २०१९ अनुसार कायदेशीर सल्लागार नेमणे जरुरी आहे जणेकरुन पुनर्विकास प्रक्रियेतील सर्व बाबी कायद्यांच्या कसोटीवर तपासल्या जातील व प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नाही. या कामी संस्थेने पुनर्विकास ~~कामा~~ प्रकल्पांच्या कायदेशीर बाबींचे सखोल ज्ञान व अनुभव असलेल्या फर्मस् कडून दरपत्रक मागविले व त्यानुसार मे. प्रथम लिगल फर्म यांची संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी कायदेशीर सल्लागार म्हणून निवड केली. संस्थेस पुनर्विकास प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी कायदेशीर सल्ला देणे, कायदेशीर दस्तावेज बनवून देणे,

योग्य तो विकासक निवडण्यास सल्ला देणे तसेच विकासकाबरोबर करावयाच्या विकसन कराराचा मसुदा बनवून देणे व असा करार नोंदणी करावयास योग्य ते मार्गदर्शन करणे ही कायदेशीर सल्लागाराची कामे राहतील.

सभेने सर्वानुमते मे. प्राइम लिगल, पनवेल, यांची कायदा सल्लागार म्हणून नेमण्यास व शुल्क रु. ... या किंमतीची त्यांची ऑफर मान्य केली व तसे नेमणूक पत्र देण्यास अध्यक्ष व सचिव यांना अधिकार बहाल केले.

सूचक : श्री. विजय जेठवा

अनुमोदक : श्री. प्रदीप साठे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

दिनांक १४-०७-२०२४ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेच्या इतिवृत्ताची नोंद घेतल्याची सभासदांची पोचपावती

१) श्रीमती अनिता केसला — अनिताचंद्रकेसला
२) श्री. कैलास सोलंकी / श्रीमती शितल सोलंकी
३) श्री. प्रभाकर साळुंखे / श्रीमती दिपाली साळुंखे
४) श्री. प्रदीप साठे
५) डॉ. श्री. आशिष गांधी
६) श्रीमती सरिता प्र. गांधी
७) श्री. सतीश जगताप / श्री. रोहित जगताप
८) श्री. अभिजीत जाधव / श्री. सत्यवान नाईक
९) श्री. दिलीप लक्ष्मण देसमुख
१०) श्रीमती नीना गोटेल
११) श्री. सिध्दार्थ म्हात्रे
१२) श्री. विजय जेठवा
१३) श्रीमती नंदा जेठवा — नंदा चंद्रकांत जेठवा
१४) श्री. सुदेश जोशी